Date : / /
Page No.:

## - घर -

### - घराचं घरपणं -

आठवणींची साठवण सर्वांच्या मनात असते. त्यात काही आपलं घर किंवा घरांच्या आठवणी सुध्दा असतात. कधीतरी निवांत क्षणी, आपण कुठे कुठे राहिलो तिथे आपलं घर कसं होतं? किती शहरं किती वेगवेगळी घरं आपण अनुभवली? या विचारात एकदा मन रमलं की ते गेलेले दिवस समोर दिसू लागतात.

माझं घर हा सगळ्यांचा weak-Point असतो. अगदी लहान मुलं पण चार दिवस कुठे जाऊन आल्यावर त्यांच्या राज्यात (घरात) परत आल्याचा जो आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसतो तो पाहण्यासारखा असतो. राजाला राजवाडा प्रिय पण एखाद्या गरीबाला राजवाड्यांत रहा म्हटलं तर त्याला त्याची झोपडीच लाख मोलाची असते. पण घराला घरपणं कसं येणार? नुसत्या चार भिंती-छप्पर-दारं-खिडक्या म्हणजे घर झालं; पण त्यात जिवंतपणा येण्यासाठी त्यात प्रेम, जिव्हाळा समाधान यांसह नात्यांची वीण असावी लागते, हसतमुख संतुष्ट नाती-गोती असली पाहिजेत तरच घराला घरपण येतं. मग घरातल्या वस्तू, त्या भिंती, दारं, खिडक्या सगळे जणू आपलं स्वागत करतात. आपलेपणा असतो.

घर ही संकल्पना कधी, कशी सुरु झाली? आदिम काळात आदिमानव घर बांधून राहत नव्हता. पण त्याही वेळी त्याला निवारा लागतच असणार. तो आदिमानव आजच्या इतका प्रगत नव्हता; पण दिवसभर कुठेही कितीही भटकला तरी अंधार झाला की कुठे गुहेत कधी झाडावर, घळीत किंवा झाडवेलींच्या जाळीत कुठेतरी तो आश्रयाला जात असे; हे आपण इतिहासात वाचतो. वन्यप्राणी आजही रानावनात त्यांचं भक्ष्य शोधीत फिरतात पण त्यांच्या ठरलेल्या ठिकाणावर ते बरोबर आश्रयाला येतात. पक्षी मैलोन्‌मैल दाणा-पाण्याच्या शोधात दूरवर जातात; पण रात्री बरोबर घरट्यांत परत येतात.

एवढंच काय जो या पृथ्वीतलावर जन्मला त्याला निवारा लागतोच. ते त्याच सुरक्षीत ठिकाण असतं.

या सगळ्यांमध्ये मनुष्यप्राणीचं एक असा आहे की निर्मात्याने त्याला बुध्दीचं वरदान दिलं आहे. त्यामुळे कालांतरानी त्याला उन्हापासून, थंडी, पाऊस, वादळ वाऱ्यापासून संरक्षणाची जरुरी भासू लागली. हळूहळू प्रगत होऊन तो आपलं आश्रयस्थान निर्माण करू लागला. मग त्या स्थानाला 'घर' हे नामाभिधान पण केलं.

असं आपलं घर आलिशान महल असेल, एखादा दोन-तीन खोल्यांचा ब्लॉक असेल किंवा झोपडी असेल. प्रत्येकाचं आपलं घर हे 'गृहमंदीर'च असतं. त्याचा प्रिय निवारा असतो.



म्हणून म्हणतात न !
घर असावं घरासारखं
सूर जुळावे परस्परांचे,
नकोत नुसती गाणी;
अश्रूतूनही प्रीत झरावी,
नकोच नुसते पाणी.

— × — × — × —



आशा पावगी
"आनंदवन" - B-10
वृंदावन कॉम्प्लेक्स,
कोथरूड - पुणे.

— × —